# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 01/01/2024 (सोमवार) दुपार

---

## नागपूर ग्रामीणचे अवैध रेती कारवाईमध्ये २०२३ मध्ये २१९ टक्क्याने वाढ

१) नागपूर ग्रामीण जिल्हा अंतर्गत अवैध रेती वाहतुक बाबत २०२२ चे सप्टेंबर ते डीसेंबर दरम्यान कारवाई मध्ये ४७ केसेस दाखल केले होते. त्या तुलनेमध्ये २०२३ चे सप्टेंबर ते डीसेंबर दरम्यान कारवाई मध्ये १०३ केसेस केल्या असुन यामध्ये ११९ टक्के वाढ झाली आहे. तसेच २०२२ सप्टेंबर ते डीसेंबर मध्ये ७४ आरोपीतांवर कारवाई करण्यात आली होती त्या तुलनेत २०२३ सप्टेंबर ते डीसेंबर मध्ये २६३ आरोपीतांवर कारवाई केली असुन यामध्ये २५५ टक्के वाढ झाली आहे.

२) २०२२ सप्टेंबर ते डीसेंबर मध्ये एकुण जप्त केलेल्या रेतीची किंमत १२,३१,८००/—रू. होती. त्या तुलनेत २०२३ सप्टेंबर ते डीसेंबर मध्येएकुण जप्त केलेल्या रेतीची किंमत २३,९१,३४०/—रू. केली असुन यामध्ये ९४ टक्के वाढ झाली आहे.

३) २०२२ सप्टेंबर ते डीसेंबर मध्ये एकुण जप्त केलेल्या वाहनाची किंमत १२,२०,००,०००/—रू. होती. त्या तुलनेत २०२३ सप्टेंबर ते डीसेंबर मध्ये एकुण जप्त केलेल्या वाहनाची किंमत १९,१९,९३,२५०/—रू. केली असुन यामध्ये ५७ टक्के वाढ झाली आहे.

४) २०२२ सप्टेंबर ते डीसेंबर मध्ये एकुण जप्त केलेल्या मुद्देमालाची किंमत १२,३२,३१,८००/—रू. होती. त्या तुलनेत २०२३ सप्टेंबर ते डीसेंबर मध्ये एकुण जप्त केलेल्या मुद्देमालाची किंमत १९,४३,८४,५९०/—रू. केली असुन यामध्ये ५८ टक्के वाढ झाली आहे.

| २०२२ | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Month | NO. OF CASES | NO. OF ACCUSSED | SAND AMOUNT | VEHICLE AMOUNT | TOTAL AMOUNT |
| SEP | 10 | 20 | 2,00,300 | 94500000 | 94700300 |
| OCT | 20 | 32 | 311000 | 13420000 | 13731000 |
| NOV | 12 | 15 | 53000 | 6980000 | 7033000 |
| DEC | 05 | 07 | 667500 | 7100000 | 7767500 |
| TOTAL | 47 | 74 | 1231800 | 12200000 | 123231800 |

| २०२३ | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Month | NO. OF CASES | NO. OF ACCUSSED | SAND AMOUNT | VEHICLE AMOUNT | TOTAL AMOUNT |
| SEP | 17 | 40 | 608640 | 33660000 | 34268640 |
| OCT | 36 | 104 | 948000 | 66563900 | 67511900 |
| NOV | 17 | 39 | 203500 | 17110350 | 17313850 |
| DEC | 33 | 80 | 631200 | 74659000 | 75290200 |
| TOTAL | 103 | 263 | 2391340 | 191993250 | 194384590 |
| Increase+/- | 56 | 189 | 1159540 | 69993250 | 71152790 |
| Increase % | 119% | 255% | 94% | 57% | 58% |

# पोलीस स्टेशन सावनेरची हुक्का ओढणाऱ्याविरूद्ध कारवाई

पोलीस स्टेशन सावनेर हद्दीतील टाकळी भन्साळी येथील विराट फॉर्म हाऊस येथे मा. श्री. अनिल मस्के साहेब, भा.पो.से. उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग यांचे मार्गदर्शनाखाली API नागवे, API भस्मे व पोलीस स्टेशन सावनेर येथील स्टाफ यांचे मार्फतीने दिनांक ०१/०१/२०२४ चे ०२.५५ वा. रेड केली असता तेथे अवैध्यरीत्या हुक्का ओढतांना **आरोपी नामे– १) पियुष सुरेश विकोडीकर, वय ३० वर्ष, रा. प्लॉट नं. १२ सोनेगाव खाबंला नागपुर २) शुभम रमेश आमदरे वय ३० वर्ष रा. छत्रपती नगर नागपुर** मिळुन आले तसेच फॉर्म हाऊस चालक अजय भगवानप्रसाद तिवारी, वय ४२ वर्ष, रा. छावणी नागपुर याने हुक्का पिण्याचे साहीत्य पुरवले असुन घटनास्थळावरून हुक्का साहीत्य जप्त करण्यात आले असुन आरोपीवर कलम १८८ भा.द.वी. व ४, २० कोप्ता कायद्यान्वये कारवाई करण्यात आली आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर